MHOS040006892026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २२९/२०२६**
**मुमताज बाबुलाल शेख व इतर वि. निरंक**

**निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत**

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ मधील कलम २ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी सादर केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे** :-

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, **बाबुलाल मौलासाब शेख** हे **दिनांक १८/१२/२०२५** रोजी मार्कडेंय सोलापूर सहकारी रुग्णालय, सोलापूर ता. व जि. सोलापूर येथे मयत झाले आहेत. मयत **बाबुलाल मौलासाब शेख** हे मूळचे मौजे ईटकळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथील रहिवासी होते. परंतु मयत **बाबुलाल मौलासाब शेख** हे मोलमजूरीचे काम करण्यासाठी सोलापूर येथे गेले होते व ते तेथेच मयत झालेले आहेत. मयत **बाबुलाल मौलासाब शेख** हे अर्जदार क्र. १ चे पती आहेत तर अर्जदार क्र. २ यांचे वडील आहेत. मयत **बाबुलाल मौलासाब शेख** यांची आई **साबिराबी मौलासाब शेख** हया यापूर्वी मयत झालेल्या आहेत. मयत **बाबुलाल मौलासाब शेख** यांना अर्जदारांशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना **बाबुलाल मौलासाब शेख** यांच्या मृत्यूनंतर ते कायदेशीर वारस असलेबाबत शासकीय व निमशासकीय कार्यालयात

वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३.  प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर दिनांक १३/०३/२०२६ रोजीचे ' आम संघर्ष टाईम्स' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली आहे. सदर वर्तमानपत्राची प्रत **(नि.क्र.१०)** वर दाखल आहे. अर्जदारांनी मयत **बाबुलाल मौलासाब शेख** यांचे मृत्यू प्रमाणपत्र **(नि.क्र.१२)** वर दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डची छायांकित प्रती **(नि.क्र.१३ व १४)** वर दाखल केलेले आहेत.

४.  उपरोक्त वर्तमानपत्रामधील जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेकडून अर्जदार हे मयत **बाबुलाल मौलासाब शेख,** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप असलेस जाहीर प्रगटन काढून आक्षेप मागविणेत आले. परंतु, आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

५.  अर्जदार क्र. १ मुमताज बाबुलाल शेख यांनी त्यांचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र **(नि.क्र.११)** वर दिले आहे. अर्जदारांतर्फे साक्षीदार नामे–१. महेबुब अमीरअली पटेल **(नि.क्र.१५)** आणि साक्षीदार नामे–२. सुफिया अब्दुलगनी पटेल यांनी **(नि.क्र.१६)** अन्वये पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. तदनंतर अर्जदारांनी प्रकरणात इतर पुरावा देणे नसल्याबाबतची पुरसीस **(नि.क्र.१७)** वर दाखल केली आहे. नमुद शपथपत्रात साक्षीदारांनी अर्जदारांव्यतिरिक्त मयत **बाबुलाल मौलासाब शेख** यांचे इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद केले आहे.

६. अर्जदारांनी अर्जामध्ये मयत **बाबुलाल मौलासाब शेख** हे मौजे ईटकळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथील रहिवासी असल्याचे नमूद केले आहे. परंतु, त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा संधी मिळूनही दाखल केलेला नाही. अर्जासमवेत दाखल असलेल्या कागदपत्रांवरून हे स्पष्ट होते की, अर्जदार व मयत हे सोलापूर येथील रहिवासी आहेत. तसेच मयत **बाबुलाल मौलासाब शेख** हे देखील सोलापूर येथे मयत झालेले आहेत. अशा परिस्थितीत या न्यायालयाला सदरचा अर्ज चालविण्याचे अधिकार नाहीत. उपरोक्त केलेल्या विवेचनाचा साकल्याने विचार करता सदरचा अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

१) अर्ज नामंजुर करण्यात येतो.

MUKKANWAR ANUPAM RAJENDRA

Digitally signed by MUKKANWAR ANUPAM RAJENDRA
Date: 2026.08.04 18:23:25 +0530

**दिनांक :–०४/०८/२०२६.** **(अ.रा. मुक्कनवार)**

**ठिकाण :– तुळजापूर** **३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**तुळजापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Anuja J. Patil |
| Court | - | 3rd Jt.CJJD & JMFC Tuljapur |
| Date | - | 04/08/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 04/08/2026 |
| Order uploaded on | - | 04/08/2026 |